## MAHARASHTRA ACT No. XLVI OF 1983

## THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYAT (TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO PREPARATION OF REVISED ASSEMBLY ROLL) ACT, 1983

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २० डिसेंबर १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डी. एन. चौधरी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLVI OF 1983

## AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS TO VILLAGE PANCHAYATS

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २६ डिसेंबर १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

### ग्रामपंचायतीच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम

१९५९ **ज्याअर्थी**, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १२ अन्वये, महाराष्ट्र विधान-
चा सभेची (यात यापुढे जिचा उल्लेख "विधानसभा" असा करण्यात आला आहे) लोकप्रतिनिधित्व
मुंबई अधिनियम, १९५० याच्या उपबंधानुसार तयार केलेली आणि राज्य शासन, या संदर्भात विशेष
३. वा सर्वसाधारण आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा तारखेस, विधानसभेच्या मतदारसंघाचा जो
१९५० भाग प्रभागात वा गावात समाविष्ट करण्यात आला असेल त्या भागासाठी अमलात असलेली
चा मतदार यादी ही, त्या प्रभागाची किंवा गावाची मतदार यादी असेल ;
४३.

आणि ज्याअर्थी, सध्याची विधानसभेची मतदार यादी ही, १ जानेवारी १९८२ हा अर्हताकारी दिनांक मानून तयार करण्यात आलेली होती;

आणि ज्याअर्थी, त्यावेळी अस्तित्वात असलेली मतदार यादी दोन टप्प्यांत सुधारण्यात येत आहे आणि यापूर्वीच जेथे काम सुरू झाले अशा काही मतदारसंघांची मतदार यादी प्रथमतः १ जानेवारी १९८३ हा अर्हताकारी दिनांक मानून सुधारलेली आहे किंवा सुधारण्यात येत आहे आणि नंतर ती, १ जानेवारी १९८४ हा अर्हताकारी दिनांक मानून आणखी सुधारण्यात येणार आहे, आणि जेथे हे काम उशिरा हाती घेतले तेथे उरलेल्या मतदारसंघांच्या मतदार याद्या सरळ सरळ १ जानेवारी १९८४ हाच अर्हताकारी दिनांक मानून सुधारण्यात येत आहेत ;

आणि ज्याअर्थी, सध्याच्या कार्यक्रमानुसार तरी, महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व मतदारसंघांच्या मतदार याद्या ह्या, १ जानेवारी १९८४ हा अर्हताकारी दिनांक मानून, जानेवारी १९८४ च्या अखेरीस अंतिम रीत्या प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, आता विधानसभेच्या सर्व मतदारसंघांची संपूर्ण यादी ही १ जानेवारी १९८४ हा अर्हताकारी दिनांक मानून अंतिम रीत्या प्रसिद्ध करण्यात येऊन ती उपलब्ध झाल्यानंतरच, ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेणे आणि त्या प्रयोजनासाठी, पंचायतीच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, निवडणुका अशा लांबणीवर टाकल्यामुळे, पंचायतीच्या विद्यमान सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी तदनुसार वाढवणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी आणि परिणामी वर सांगितल्याप्रमाणे पदावधी वाढवण्यासाठी तसेच तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे आवश्यक झाल्याबद्दल व तशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झालेली होती ; आणि म्हणून त्यांनी दिनांक ८ नोव्हेंबर १९८३ रोजी, महाराष्ट्र ग्रामपंचायती (विधानसभेच्या सुधारित मतदार याद्या तयार करावयाच्या असल्यामुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८३ हा प्रख्यापित केला होता ; (१९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १९.)

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र ग्रामपंचायती (विधानसभेच्या सुधारित मतदार याद्या तयार करावयाच्या असल्यामुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक १९ सप्टेंबर १९८३ रोजी अमलात आल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, ३१ मार्च १९८४ ही तारीख, किंवा राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल अशी आधीची तारीख धरून, त्या तारखेपर्यंत अमलात राहील आणि नंतर तो समाप्त होईल. मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आले होते असे समजून ते, हा अधिनियम समाप्त झाल्यावर लागू होईल. (१९०४ चा मुंबई १.)

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) "प्रशासक" म्हणजे, पंचायत अधिनियमाच्या कलम १६०, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये नेमण्यात आलेला प्रशासक आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम १४५, पोट-कलम (२), खंड (ब) किंवा कलम १५१, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ब) "पंचायतीची निवडणूक" म्हणजे, पंचायतीच्या सदस्यांची निवडणूक, परंतु त्यात सरपंचाच्या किंवा उप-सरपंचाच्या निवडणुकीचा समावेश होत नाही ;

(क) "पंचायत" म्हणजे, पंचायत अधिनियमान्वये स्थापन केलेली किंवा स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येणारी पंचायत ;

१९५९ चा मुंबई ३. (ड) "पंचायत अधिनियम" म्हणजे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.

पंचायतींच्या विवक्षित निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे आणि पंचायतींचे सदस्य व प्रशासक यांचा पदावधी वाढवणे.

३. पंचायत अधिनियमामध्ये किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमामध्ये किंवा उप-विधींमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी,—

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभापासून ३१ मार्च १९८४ या दिवसासह त्या तारखेपर्यंतच्या किंवा राज्य शासन, कलम १, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचित करील अशा अगोदरच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा केला आहे) कोणत्याही पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक आणि कोणत्याही पंचायतीमधील रिकामी होणारी नैमित्तिक जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या तारखेस पदावर असणारे (मग त्यांचा पदावधी उक्त कालावधीत कोणत्याही वेळी उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा उक्त तारखेस किंवा त्या तारखेनंतर संपणार असो) कोणत्याही पंचायतीचे सदस्य (मग ते निवडलेले किंवा नेमलेले असोत) किंवा कोणत्याही पंचायतीचा प्रशासक किंवा पंचायतींचे प्रशासक यांचा (कोणत्याही वाढीव पदावधीसह) पदावधी यथास्थिति, वाढवण्यात आल्याचे किंवा वाढवण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल ; आणि असा प्रत्येक सदस्य किंवा प्रशासक, उक्त कालावधीत पद धारण करण्याचे चालू ठेवील :

परंतु या कलमाद्वारे अशा रीतीने वाढवण्यात आलेला सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी संपल्यानंतर ते, पुनर्रचित पंचायतीच्या ज्या पहिल्या सभेत गणपूर्ती होईल त्या सभेपर्यंत, पदावर राहतील.

ज्यांचा पदावधी वाढवलेला आहे त्या सदस्यांचे व प्रशासकांचे अधिकार आणि विवक्षित कृत्यांचे विधिग्राह्यीकरण.

४. लगतपूर्ववर्ती कलमाखाली ज्यांचा पदावधी यथास्थिति, वाढवण्यात आल्याचे मानण्यात येत असेल किंवा वाढवण्यात आला असेल असे सर्व पंचायत सदस्य व सर्व पंचायत प्रशासक हे, वाढीव कालावधीत देखील (मग या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी किंवा त्यानंतर असो) असे सदस्य किंवा यथास्थिति प्रशासक म्हणून असलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यात आणि त्यांची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व तसे ते असतील आणि उक्त कालावधीत अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने केलेले कोणतेही कृत्य हे, केवळ पदावधी वेळेवर वाढवण्यात आलेला नव्हता किंवा अन्य प्रकारे तो रीतसर वाढवण्यात आलेला नव्हता किंवा वाढीव कालावधीमध्ये पंचायत सदस्य किंवा प्रशासक हा, यथास्थिति, पंचायत सदस्यांच्या किंवा प्रशासकाच्या सर्व अधिकारांचा वापर करू शकत नव्हता व त्याची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडू शकत नव्हता, केवळ याच कारणावरून, विधिअग्राह्य समजण्यात येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही.

**विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा वाढीव पदावधी संपल्यानंतर नवीन पंचायतींची पुनर्रचना करण्यासाठी करावयाची व्यवस्था.**

५. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेनंतर (ही तारीख उक्त कालावधी संपण्यापूर्वीची तारीख असेल) जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकारी, या अधिनियमानुसार ज्यांचा पदावधी वाढवण्यात आला आहे अशा विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा संपल्यानंतर शक्यतो लवकर, पंचायत अधिनियम व त्याखाली केलेले नियम व उप विधी यांनुसार नवीन पंचायतींची रचना करण्यासाठी व्यवस्था करतील.

**सन १९५९ चा मुंबई अधिनियम ३ लागू असणे.**

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद केलेल्या गोष्टींव्यतिरिक्त, पंचायत अधिनियमाच्या तरतुदी, संबंधित पंचायतींना इतर सर्व बाबतीत लागू होतील.

**पंचायतींच्या विवक्षित निवडणुकांना अधिनियम लागू नसणे.**

७. या अधिनियमातील कोणतीही गोष्ट या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी तहसीलदाराने अथवा संबंधित इतर अधिकाऱ्याने ज्या कोणत्याही पंचायतीच्या कोणत्याही निवडणुकीच्या किंवा पोट-निवडणुकीच्या विविध टप्प्यांसाठी तारखा नेमून दिल्या असतील त्या निवडणुकीस किंवा पोट-निवडणुकीस, लागू होणार नाही; आणि अशा निवडणुकीचे किंवा पोट-निवडणुकीचे काम यथास्थिति तहसीलदाराने किंवा इतर अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार पूर्ण करण्यात येईल.

**अडचणी दूर करणे.**

८. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास प्रसंगपरत्वे, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असल्याचे आढळून येईल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल.

**सन १९८३ चा अध्यादेश क्रमांक १९ याचे निरसन व व्यावृत्ती.**

९. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायती (विधानसभेच्या सुधारित मतदार याद्या तयार करावयाच्या असल्यामुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश १९.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यासह) ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये, यथास्थिति, करण्यात आल्याचे किंवा काढण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.